
# भावार्थ ज्ञानेश्वरी

(२१ व्या शतकासाठी)

अध्याय तेरावा , भाग तिसरा

सुलभ ओवीबद्ध रचना



विजय बळवंत पांढरे B.E. (Civil)

ई-आवृत्ती

साहित्य प्रतिष्ठान®

भावार्थ ज्ञानेश्वरी(२१व्या शतकासाठी)

अध्याय तेरावा : भाग तिसरा

मूळ लेखन : संत श्री ज्ञानेश्वर (इ.स. १२९१)

२१व्या शतकातील मराठीत ओवीबद्ध रुपांतर (इ.स. २०१०):

श्री विजय पांढरे

मु पो लाखनवाडा,

ता. खामगांव,

जि बुलढाणा. महाराष्ट्र.

9822992578

vbpandhare@gmail.com

ई प्रकाशन :

ई साहित्य प्रतिष्ठान®

9869674820

esahity@gmailcom

www.esahity.com

E Sahity Pratishthan

Eleventh floor(G1102)

Eternity

Eastern Express Highway

Thane, Maharashtra. 400604

मुखपृष्ठ रचना : श्री जावेद शेख

©श्री विजय पांढरे(२०१२)

**या पुस्तकाची प्रिंट स्वरुपातील आवृत्ती मुकुंदराज महाराज संस्थान यांनी प्रकाशित केली असून ती ३९०/- रुपयांना उपलब्ध आहे.**

प्रस्तुत ई आवृत्ती ही विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध असून कोणीही आपल्या वेबसाईट्वर डाऊनलोडसाठी विनामूल्य उपलब्ध करण्यास प्रकाशकांची कोणतीही हरकत नाही. या पुस्तकाची ई आवृत्ती प्रत्येक मराठी माणसाच्या डेस्कटॉपवर असावी हे आमचे ध्येय असून त्यासाठी **प्रत्येक मराठी माणसाचे सहकार्य अपेक्षित आहे.**

# ॥ ज्ञानेश्वरी ई पारायण अभियान ॥

जगातील सर्वोत्कृष्ट ग्रंथांपैकी श्री ज्ञानेश्वरी हा ग्रंथ आहे. त्यात परमार्थ तर आहेच. पण परमार्थाची खरी सुरूवात मनुष्य जन्म उत्कृष्टपणे जगण्यातून होते. कसे जगावे याचे उत्कृष्ट विवेचन सुंदर रितीने ज्ञानेश्वरीत केले आहे. प्रत्येक मराठी माणसाने वाचलेच पाहिजेत असे ग्रंथ म्हणजे छत्रपती शिवरायांचे चरित्र आणि श्री ज्ञानेश्वरी. पण ज्ञानेश्वरी प्रत्येक मराठी माणूस वाचतोच असे नाही. कारण १२९१ साली प्रचलित असलेल्या प्राकृतबहुल मराठीत लिहीलेली ज्ञानेश्वरी आजच्या तरुणांना समजायला कठीण जाते. अनेकजण प्रयत्न करतात पण नंतर सोडून देतात. कारण प्राकृत भाषा आजच्या तरूणाच्या ओळखीची राहिलेली नाही.

अशा वेळी ई साहित्य प्रतिष्ठान सादर करीत आहे २१व्या शतकातील सोप्या मराठीत ओवीबद्ध केलेली भावार्थ ज्ञानेश्वरी. श्री विजय पांढरे यांनी अत्यंत सोप्या भाषेत आणि २१व्या शतकातील तरुणांना समजेल अशा भाषेत ज्ञानेश्वरीचे केलेले रुपांतर आपल्याला आवडेलच. कारण मूळ ज्ञानेश्वरीतील गोडवा त्यांनी जसाचा तसा जपला आहे. रोज केवळ अर्धा तास, असे फ़क्त एकोणतीस दिवस वाचन करून आपण ज्ञानेश्वरीचे पूर्ण पारायण करू शकता. श्री विजय पांढरे लिखित २१व्या शतकासाठी सध्याच्या मराठीत ओवीबद्ध केलेली भावार्थ ज्ञानेश्वरीची भॆट आम्ही आज ई साहित्य प्रतिष्ठानच्या व्यासपीठावरून सादर करीत आहोत. ही ज्ञानेश्वरी मूळ ज्ञानेश्वरीप्रमाणेच ओवीबद्ध असून समजायला खूपच सोपी झाली आहे. मूळ प्राकृत ज्ञानेश्वरीइतकीच रसाळ. या ज्ञानेश्वरी सोबत मूळ ज्ञानेश्वरीचीही ई प्रत विनामूल्य उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी व अभियानात सामिल होण्यासाठी खालील लिंक्सना भेट द्या.

www.esahity.com http://www.facebook.com/edyaneshwari
http://edyaneshwari.blogspot.in/ http://youtu.be/yCHZ85Xzuxc

समुद्रासी त्या मिळता । गंगा अनुभवते एकता । तैसे मीच होऊन जाता । द्वैत नाही ॥६०८॥
सूर्य असता असणे । आणि सूर्य जाता जाणे । हे किरणांचे जैसे वागणे । तैसे अर्जुना ॥६०९॥
वाऱ्याच्या त्या कारण । लाटांचं घडे भासणं । परि ते पाण्याचच असणं । तसं अर्जुना ॥६१०॥
जो अनन्य यापरि । मी होऊन मजसी वरी । तोचि तो अवधारी । ज्ञान पै गा ॥६११॥
तीर्थस्थानी तपोवनात । आवडे रहाणे एकांतात । डोंगराच्या त्या गुहेत । राही सदा ॥६१२॥
पर्वताच्या त्या कुशीत । राही जलाशयाच्या परिसरात । रहाणे ते शहरात । न आवडे तया ॥६१३॥
तयाची एकांतावर प्रीति । गर्दी न आवडे तया ती । जाण मनुष्याकारे मूर्ती । ज्ञानाची तो ॥६१४॥
आणिकही पुढती । चिन्हे गा सुमती । ज्ञानाची सर्व ती । सांगतो तुजला ॥६१५॥
तरी परमात्मा ऐसे । जी एक वस्तू असे । तो ती जाणतसे । ज्ञानाकारणे ॥६१६॥
त्या एकावाचून । जी भवस्वर्गादि ज्ञानं । त्या सर्वा तो अज्ञान । माने अर्जुना ॥६१७॥
स्वर्गा जाणे सोडणं । ऐहिक सुख टाळणं । केवळ असे आत्मज्ञान । लक्ष्य त्याचे ॥६१८॥
वाटेने जात असणं । चौरस्ता तो भेटणं । मग योग्य मार्ग निवडणं । जाणतसे तो ॥६१९॥
सोडून मन बुद्धि इंद्रियांना । एकी करतसे तो ज्ञाना । संपवून ऐसे अज्ञाना । तो अमर होई ॥६२०॥
सत्य केवळ आत्मज्ञान । बाकी सर्व अज्ञान । ऐसा निश्चय असणं । अंतरी त्याच्या ॥६२१॥
ऐसा निश्चय करून । मिळवी तो आत्मज्ञान । स्थिर असे ध्रुवासमान । मन त्याचे ॥६२२॥
तयाच्या ठायी ज्ञान । चूक ते बोलणं । तो आणि ज्ञान । भिन्न नाही ॥६२३॥
मन स्थिर होता प्रकटणे । प्रयत्न करता न पावणे । ऐशा अलौकिक ज्ञाने । एकी त्याची ॥६२४॥
जाणून तत्त्वज्ञान निर्मळ । फळे एक जे फळ । त्या ज्ञानासी सरळ । मिठी त्याची ॥६२५॥
एऱ्हवी बोधा आलेनि ज्ञाने । जर ज्ञेय न दिसेचि मने । मग ज्ञान लाभ मने । झाला नाही ॥६२६॥
आंधळ्या हाती दिवा । घेऊनी काय करावा । तैसा ज्ञान आग्रह आघवा । वाया जाई ॥६२७॥
त्या शास्त्राचे कारणे । जर न होई ज्ञानाचे प्रकटणे । ते तर मग अज्ञान असणे । जाण अर्जुना ॥६२८॥
जे जे दृष्टीस दिसावे । ते परमात्म स्वरूप असावे । ऐसे मन ते व्हावे । शुद्ध अर्जुना ॥६२९॥
जे जे येती अनुभव । ते सारेच बा देव । ऐसा विश्वात्मक भाव । मनी त्याच्या ॥६३०॥
अनंत ज्ञाना कारण । बुद्धिही अनंत होणं । ते ज्ञान शब्दानं । न सांगता येते ॥६३१॥
ज्ञानाच्या कारण । विश्वचि ब्रह्म होणं । तेथेचि आहे ज्ञान । समज तू अर्जुना ॥६३२॥
तोचि होतसे ज्ञान । यात विस्मय तो कवण । सूर्यासी सूर्य म्हणणं । नवल नाही ॥६३३॥
मग श्रोतिये ते म्हणे । थांबो हे अति बोलणे । सरळ ग्रंथार्थ तो सांगणे । घडो आता ॥६३४॥
खूप झाला ज्ञानविस्तार । तुझ्या वक्तृत्वाचा पाहुणचार । शब्दांना घाल आवर । तुझ्या आता ॥६३५॥
शब्दी नसावी लांबण । या रहस्याची तुला जाण । तरी आम्हा देऊन आमंत्रण । फसवतोस का ॥६३६॥
बोलवून पंगतीला बसवणे । नि सुगरणीने अन्न घेऊन पळणे । ते का आदरसत्कार करणे । आहे कधी ॥६३७॥
सर्वगुणसंपन्न असते । पण नाही दूध काढू देते । ती गाय का कुणी पोसते । कधी ॥६३८॥
ज्ञान नसल्याकारण । दुसरे भलतेच करती निरूपण । पण तुझे हे व्याख्यान । सुंदर आहे ॥६३९॥
मनी ज्ञानलालसा असे । त्यासाठी करी योगादि सायासे । तयासाठीच बा असे । निरूपण तुझे ॥६४०॥
लागता अमृताची झडी । ती सर्वांना आवडी । कुणी का पळ काढी । बरसता अमृत ॥६४१॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

पौर्णिमा जी बहरली । जरी कित्येक युगे राहिली । तरी का कंटाळली । चकोर कधी ॥६४२॥
तैसे हे ज्ञानाचे बोलणे । तेही इतक्या रसाळपणे । मग पुरे का कोणी म्हणे । सांग तू ॥६४३॥
आला पाहुणा भाग्यवान । आणि वाढणारी सुगरण । मग जास्त जेवणे जेवण । आपोआप ॥६४४॥
तैसाच प्रसंग जाहला । ज्ञानाची आवड आम्हाला । आणि तू भेटला निरूपणाला । आज येथे ॥६४५॥
ऐसा तू भेटणं । नि आमचे अवधान वाढणं । तूच आहे ज्ञान । ज्ञानदेवा ॥६४६॥
तरी आता ज्ञानदेवा । प्रकटवून प्रज्ञेचा ठेवा । ब्रह्ममयतेच्या त्या गावा । न्यावे आम्हा ॥६४७॥
या संतवाक्यासरीसे । म्हणितले निवृत्तिदासे । माझेही असे ऐसे । मनोगत ॥६४८॥
आज्ञा तुमची ऐकून । तसाच बा मी वागीन । न वाढवता लांबण । बोलेन मी ॥६४९॥
ऐसी स्पष्ट ती करून । अठरा ती ज्ञानलक्षणं । सांगितली भगवंतानं । अर्जुनाला तेथे ॥६५०॥
ते बा ज्ञानी जन । कशाला म्हणतात ज्ञान । तयाचे ते निरूपण । केले मी ॥६५१॥
जैसे ठेवूनी करतळा । पाहणे तो आवळा । तैसे ज्ञान आम्ही डोळा । दाविले तुज ॥६५२॥
आता जया म्हणतात अज्ञान । तेही सांगतो स्पष्ट करून । लक्ष ते देऊन । ऐक अर्जुना ॥६५३॥
झाले असता ज्ञान । आपोआप उमजते अज्ञान । अंतरी होणे ज्ञान । सूत्र आहे ॥६५४॥
जसा दिवस तो सरता । रात्रीचीच उरते सत्ता । तेथे तिसऱ्याची वार्ता । आहे कोठे ॥६५५॥
तैसे ज्ञान जेथे नाही । ते अज्ञानचि पाही । तरी सांगतो काही काही । अज्ञान लक्षणे ॥६५६॥
कीर्तीसाठी जगणं । मानाची इच्छा असणं । आदरसत्कारात मानणं । संतोष त्याने ॥६५७॥
मानपानाच्या पदावरून । न आवडे तया उतरणं । तयाठायी अज्ञान । जाण अर्जुना ॥६५८॥
स्वत:ची ती कीर्ती । ते स्वयेचि सांगती । अनीतीस मानती नीती । अज्ञानी अर्जुना ॥६५९॥
करून ज्ञानाची जाहिरात । सुकृताचा डांगोरा पिटतात । सर्व कर्म ते करतात । स्वार्थासाठी ॥६६०॥
ज्ञानाचे सोंग घेऊन । सामान्य जना फसवणं । तो अज्ञानाची खाण । जाण अर्जुना ॥६६१॥
वणवा पसरता वनी । स्थावर जंगम जाती जळूनी । तैसे यांचेपासूनी । दु:ख सर्वा ॥६६२॥
तयाचे ते बोलणे । जसे पहारीने टोचणे । विषाहूनही घातक असणे । हेतू त्यांचे ॥६६३॥
तयाते बहू अज्ञान । तो अज्ञानाची खाण । हिंसेसी प्रमुख स्थान । जीवनी त्याच्या ॥६६४॥
जसे भात्याचे ते असणे । फुगणे आणि आकुंचणे । तसा हर्ष आणि खेदाने । बाधित तो ॥६६५॥
धूळ त्या सोसाट्याच्या वाऱ्यात । जशी आकाशी असे उडत । तैसा असे तो फुगत । ऐकता स्तुती ॥६६६॥
निंदा ती ऐकून । कपाळ घेत असे बडवून । तयाठायी तू अज्ञान । जाण अर्जुना ॥६६७॥
मान अपमानाकारण । जर घडे सुखदु:खाचं अनुभवणं । तेथे अज्ञानाचं असणं । नक्की अर्जुना ॥६६८॥
जो आतल्या गाठीचा असतो । तो वरवर दयाळू वाटतो । पण अंतरंगी असतो । दुष्ट अर्जुना ॥६६९॥
जसे पारध्याचे चारा घालणे । तसे याचे चांगले वागणे । ढोंग करून फसवणे । स्वभाव यांचा ॥६७०॥
गार सोन्याने गुंडाळली । का निंबोळी जैसी पिकली । तैसी जयाची भली । बाह्यक्रिया ॥६७१॥
अज्ञान तयाचिया ठायी । ठेविले असे पाही । या बोला काही । नाही अपवाद ॥६७२॥
कंटाळे तो गुरुकुळाला । टाळतसे गुरूभक्तीला । विद्या घेऊन माजला । दुष्ट जैसा ॥६७३॥
तयाचे नाव घेणे । ते वाचा मलिन होणे । परंतु ते उच्चारणे । घडले येथे ॥६७४॥
प्रायश्चित्ता कारण । आता गुरुभक्तीचं नाव घेईन । मग वाचेचे मलिनपण । जाईल आता ॥६७५॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

गुरुद्रोहाच्या नामोच्चाराने। घडले जे पापाचे घडणे। ते निस्तारून जाणे। स्मरता गुरुभक्ती ॥६७६॥
गुरुभक्तीसी स्मरता। संपून जाते मलिनता। अजून तू ऐक आता। अज्ञान चिन्हे ॥६७७॥
अंगी कर्मे ढिला। जो मने विकल्पे बुडला। रानातील काट्यांनी भरला। आड जैसा ॥६७८॥
रानातल्या त्या आडात। आत हाडेच असतात। आणि काटेकुटे असतात। वरती अर्जुना ॥६७९॥
जसा भुकेला कुत्रा तो। उघडे झाकले न समजतो। तसा लोभासाठी होतो। दुष्ट हा ॥६८०॥
जसे त्या कुत्र्याच्या ठायी। नीती अनीती नाही। तैसे तो व्याभिचारातही। रममाण होतो ॥६८१॥
कर्तव्य ते चुके। की नित्य नैमित्तिक हुके। तरी काहीच न दु:खे। मनामाजी ॥६८२॥
नसे लाज पापाचाराची। नाही चाड ती पुण्याची। चित्तात खळबळ संशयाची। सदैव त्याच्या ॥६८३॥
तेथंच अर्जुना जाण। वसतसे ते अज्ञान। असे केवळ बा धन। लक्ष त्याचे ॥६८४॥
मुंगीच्या त्या धक्क्याने। गवताची बीजे गळणे। तसे किंचित त्या स्वार्थाने। चळतसे तो ॥६८५॥
पाय पडता क्षणी। डबके जाते ढवळूनी। तैसे भयभीत सदैव चिंतेनी। मन त्याचे ॥६८६॥
इच्छांच्या त्या पुरात। तो वाहून असे जात। दुधीभोपळा जसा पुरात। वाहून जाई ॥६८७॥
वावटळीच्या कारणे। धुळीने आकाशी उडणे। तसे दु:खाच्या वार्तेने। कंपित तो ॥६८८॥
त्या वादळाच्या प्रमाणे। तयाने स्थिर ते नसणे। क्षेत्री तीर्थी जाणे। नावडे तया ॥६८९॥
जसा माजलेला सरडा। वाऱ्या करी शेंडा बुडा। तैसा हा गधडा। फिरे निष्फळ ॥६९०॥
वा जसा बिनबुडाचा रांजण। पडला तरच स्थिर रहाणं। अन्यथा सदैव भ्रमण। पाया त्याच्या ॥६९१॥
तयाच्या ठायी अखंड। अज्ञान असे उदंड। चंचलतेत तो भावंड। मर्कटाचे पहा ॥६९२॥
आणि पै गा धनुर्धरा। जयाचिया अंतरा। नसे संयमाचा वारा। किंचित तेथे ॥६९३॥
ओढ्यास येता लोंढा। तुटे जसा वाळूचा वरंडा। तैसा अपकीर्तीच्या तोंडा। बिहेना जरा ॥६९४॥
व्रत ते मोडणे। स्वधर्म तो सोडणे। यम नियम तोडणे। स्वभाव त्याचा ॥६९५॥
नाही पापाचा कंटाळा। नेणे पुण्याचा जिव्हाळा। लाजेच्या त्या मुळा। उपटले ज्याने ॥६९६॥
कुळपरंपरा न जुमाने। वेदाज्ञेसी ठोकरणे। चांगले वाईट न जाणे। मन त्याचे ॥६९७॥
पोळ जैसा मोकाट। वारा जैसा अफाट। फुटलेल्या धरणाचा थाट। तयाठायी ॥६९८॥
आंधळा हत्ती कावरला। डोंगर जैसा पेटला। तसा विषयात भरकटला। सदैव हा ॥६९९॥
उकिरड्यावर काय न पडे। मोकाट ढोर कोणा सापडे। तसे चित्त याचे बापुडे। बेफाम अर्जुना ॥७००॥
अन्नछत्राचे ठिकाण। वेश्येचे ते स्थान। आणि वाण्याचे दुकान। खुले जैसे ॥७०१॥
तैसे जयाचे अंत:करण। तयाच्या ठायी संपूर्ण। जाण तू अज्ञान। भरले आहे ॥७०२॥
आणि विषयाची गोडी। मेला तरी न सोडी। आणि धन तो जोडी। स्वप्नातही ॥७०३॥
अखंड भोग ते आवडणं। सकाम साधनांचे व्यसन। विरक्तांचे मुख पाहून। स्नान करी ॥७०४॥
विषय याला कंटाळतो। पण हा सावध न होतो। सडलेल्या हातानी अन्न खातो। महारोगी जसा ॥७०५॥
जसे त्या गाढवीने। लाथ मारून नाकाडे फोडणे। तरी गाढवा मागे सरणे। ठाऊक नाही ॥७०६॥
तैसे विषय तया आवडती। त्यासाठी आगीत उडी घालती। ऐसी भोगाची ती। आवड तया ॥७०७॥
छाती फुटेपर्यंत। हरिण असे धावत। मृगजळा असे समजत। पाणी जैसे ॥७०८॥
जन्मल्यापासून मरेपर्यंत। विषयांना नसे तो कंटाळत। उलट प्रेमाने असे कवटाळत। भोगांना तो ॥७०९॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

पहिल्यांदा त्या बाळदशे । आई बापाचे मनी पिसे । मग स्त्रीदेहासे । भुलतसे तो ॥७१०॥
स्त्रीभोग ते संपता । म्हातारपण ते येता । पुत्र नातवांसी ममता । उपजते तेथे ॥७११॥
आंधळे पिल्लू जैसे । मुरकुंडी मारून रहातसे । तसा तो न कंटाळतसे । विषया कधी ॥७१२॥
जाण तयाच्या ठायी । अज्ञानास सीमा नाही । आता अजून काही । सांगतो चिन्हे ॥७१३॥
तो देहास मी मानी । ऐसे अज्ञान तयाच्या मनी । कर्मे मग स्वार्थ धरुनी । अखंड करी ॥७१४॥
आणि उणे का पुरे । जे जे काही आचरे । तयाचेनि अहंकारे । फुगून जाई ॥७१५॥
डोईवर प्रतिमा ठेवणे । मग भगताचे ते घुमणे । तसा चाले माजलेपणे । हा विद्येस्तव ॥७१६॥
स्वत:स श्रेष्ठ मानून । म्हणे माझ्याच घरी संपत्ती धन । माझ्या जैसे आचरण । कोठे आहे ॥७१७॥
माझ्याहून थोर नाही कोणी । मीच एकटा ज्ञानी । ऐसा गर्व त्याच्या मनी । भरला असे ॥७१८॥
जसे त्या व्याधीत । पक्वान्न नसती चालत । तसे त्यास नाही सहन होत । कोणाचे भले ॥७१९॥
दाखवी तो अवगुण । वाईट त्याचे आचरण । सर्वांना त्रास देणं । आवडे तया ॥७२०॥
पाणी उडवता तडतडतो । वारा घालता विझतो । पण घरादारा जाळतो । अग्नी जैसा ॥७२१॥
कर्म थोडेसेच करी । पण जाहिरात ती भारी । अहंभाव त्याच्या उरी । भरला असे ॥७२२॥
दूध घेता तापात । विष असे ते बनत । सर्पाठायी विष जसं उपजतं । पाजता दूध ॥७२३॥
तसा गुणी पण मत्सरी । जाणकार पण अहंकारी । तपाचा ताठा भारी । मनी त्याच्या ॥७२४॥
शूद्र राज्यावर बसला । अजगराने प्राणी गिळला । तसा गर्वाने फुगलेला । सदैव हा ॥७२५॥
लाटणे जसे न लवे । धोंडा कधी न द्रवे । मांत्रिकासि त्या नागवे । फुरसे जैसे ॥७२६॥
किंबहुना त्या तेथे । अज्ञान असे वाढते । हेच सांगतसे ते । तुजला अर्जुना ॥७२७॥
विसरून आत्मतत्त्वास । सत्य माने देह मनास । जे आहे काळाचा घास । अर्जुना माझ्या ॥७२८॥
कृतघ्नावर उपकार करणे । चोरा व्यवहार सोपवणे । कोडग्याचे कान उपटणे । व्यर्थ जैसे ॥७२९॥
कान शेपूट कापून हाकलले । तरी कुत्रे घरात घुसले । अजून रक्तही नसे वाळले । जखमेच्या त्याच्या ॥७३०॥
बेडूक सापाने अर्धा गिळला । तरी धरू पाही मक्षिकेला । विसरून त्या मरणाला । स्वत:च्या अर्जुना ॥७३१॥
तैसे नऊही द्वारे स्त्रवती । देहा आली मरणगती । तरी मृत्यूचे भान चित्ती । नाही त्याच्या ॥७३२॥
आईच्या त्या गर्भाशयात । आणि विष्ठेच्या उष्णतेत । अर्जुना नऊ मासपर्यंत । उकडला जो ॥७३३॥
ऐसी गर्भाची ती व्यथा । नशिबी आली जन्मता । ते काहीच बा सर्वथा । न स्मरे तया ॥७३४॥
मलमूत्राच्या चिखलात । जीव असे जो लोळत । तया पाहून नाही कंटाळत । हा कधी ॥७३५॥
मागचा जन्म गेला । आणि आताचा नवा आला । हे कधीच बा तयाला । भान नाही ॥७३६॥
जन्म ते घेणं । आणि देहभाव आवडणं । म्हणून मृत्यूची ती आठवण । तया नाही ॥७३७॥
जीवभावात तो गुंतला । इंद्रियांमाजी रमला । मग आठवण मृत्यूची तयाला । येत नाही ॥७३८॥
डबक्यातल्या त्या माशा । डबके आटण्याची नसे आशा । म्हणून अथांग सागरा जैशा । डोहा मुके ॥७३९॥
गाण्याला त्या भुलून । हरणाला पारधी न दिसणं । जसं माशाने उंडी गिळणं । न पाहता गळ ॥७४०॥
दिव्याची ज्योति पाहून । ती आग बा मला जाळीन । याची जशी ती जाणं । नाही पतंगा ॥७४१॥
घर जळत असून । मूर्खाने झोपून राहणं । ते विषात अन्न शिजवणं । तैसे अर्जुना ॥७४२॥
देहाचे रूप घेऊन । मृत्यूनेच देह होणं । इंद्रियसुखाकारणं । नेणे तो ॥७४३॥



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

शरीरास त्या जपणे । रात्रंदिवस त्याने । देहा विषयसुखा कारणे । सत्य मानी ॥७४४॥
वेश्येच्या नादी लागून । जैसं घडे नागवणं । तैसे या देहाकारणं । नागवे हा ॥७४५॥
शत्रूशी मैत्री करणे । तेच बा प्राण जाणे । रांगोळीस स्नान घालणे । नाश तिचा ॥७४६॥
रोगाच्या त्या कारणे । शरीर ते जाड होणे । तैसा हा देहभावाने । फसवला गेला ॥७४७॥
सुळासी देता आलिंगन । आयतेच येते मरण । तसा देहाच्या ओढीनं । मरतसे हा ॥७४८॥
देह जसा जसा वाढतो । तसा भोगाचा सुकाळ होतो । आणि आपोआप तो फसतो । देहामाजी ॥७४९॥
इंद्रियभोगाकारणे । मरणाने जवळ येणे । अर्जुना जसे मीठ पाण्याने । धुतले जाते ॥७५०॥
ऐसे जीवन जातसे संपून । नि जवळ येतसे मरण । पण तयाचे ते स्मरण । नाही त्याला ॥७५१॥
देहचि असे मरण । नाही याचे त्याला भान । मनइंद्रियाकारणं । नागवला जो ॥७५२॥
तो अज्ञानदेशीचा सम्राट । नाही भिन्नता या मतात । जो असा देहमनात । अडकला असे ॥७५३॥
जीवभावाच्या कारण । न दिसे तया मरण । जशी वृद्धत्वाची नसे आठवण । तारुण्यात अर्जुना ॥७५४॥
जसा कड्यावरुन लोटला गाडा । की शिखरावरुनी सुटला धोंडा । तसा तो न देखे पुढां । वार्धक्य आहे ॥७५५॥
ओढाळ नाल्या आले पाणी । टोणग्यांची लागली झुंजणी । तैसे तारुण्या लागुनी । बेहोष हा ॥७५६॥
पुष्टी कमी होते । कांती ती जाऊ लागते । आणि मस्तक पहा थरथरते । अर्जुना माझ्या ॥७५७॥
केस जाती पिकून । आणि हालते ती मान । पण मायेचा पसारा मांडून । बसतोच हा ॥७५८॥
वस्तू उरावर आदळेपर्यंत । आंधळ्या नसे ते समजत । जसा आनंद डोळ्यावरील गुंगीत । वाटे आळशा ॥७५९॥
आजच्या त्या तारुण्यात । जया वृद्धत्व नाही दिसत । तोच बा अज्ञान मूर्तिमंत । आहे अर्जुना ॥७६०॥
जेधवा म्हातारा कुबडा भेटतो । तयासी नाव तो ठेवतो । पण विसरून तो जातो । स्वत:च्या मरणा ॥७६१॥
जरी त्या म्हातारपणात । मरणाची लक्षणे दिसतात । पण नसे तारुण्याचा भ्रम जात । याचा अर्जुना ॥७६२॥
तो असे अज्ञानाचे घर । सत्य असे हे उत्तर । ऐक काही अजून थोर । लक्षणे त्याची ॥७६३॥
जर वाघाच्या रानात चरून ।सुदैवाने पोळ परतला बचावून ।मग तयाचं ते पुन्हा जाणं । निश्चित अर्जुना ॥७६४॥
जसा सर्पाच्या बिळातून । ठेवा काढून आणणं । आणि साप नाही समजणं । बिळात अर्जुना ॥७६५॥
ऐसे अनुभव येता । मनी प्रकटते भ्रमता । मग मरणाची ती सत्ता । तो मानीच ना ॥७६६॥
वैरी आहे झोपला । पक्षी गाफील जो राहिला । मग तो आपोआप संपला । पिल्लांसह ॥७६७॥
असता आहार निद्रा व्यवस्थित । रोग नाही होत तोपर्यंत । असतो तो निश्चिंत । रोगाविषयी ॥७६८॥
आणि स्त्रीपुत्रांदिकांमेळे । संपत्ती जवं जवं फळे । मग अधिकच तयाचे डोळे । आंधळे होती ॥७६९॥
पुढे वियोग तो घडेल । आणि विपत्ती ती येईल । हे दु:ख पुढील । दिसेना तया ॥७७०॥
आणि माझ्या गा पांडवा । अज्ञानी तोचि जाणावा । जो इंद्रिया अवाच्या सव्वा । विषय देई ॥७७१॥
तारुण्याच्या आवेशात । नि संपत्तीच्या जोशात । वागू नये तसे वागत । भरकटे तो ॥७७२॥
न करावे ते करी । असंभाव्य मनी धरी । नको तो विचार करी । मन त्याचे ॥७७३॥
जेथे शिरू नये तेथे शिरतो । जे मागू नये ते मागतो । स्पर्श करू नये ते शिवतो । मुद्दाम तो ॥७७४॥
जाऊ नये तेथे जातो । न पहावे ते पहातो । न खावे ते खातो । उद्दामपणे ॥७७५॥
न करावा तो संग करतो । आचरू नये ते आचरतो । लागू नये तेथे लागतो । अज्ञानपणे ॥७७६॥
न ऐकावे ते ऐकतो । न बोलावे ते बोलतो । पण आचरणातील दोष तो । जाणत नाही ॥७७७॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

तयासी जे रुचते । तया कर्तव्य नाव देऊन ते । तो अगदीच भलतेसलते । करून टाकी ॥७७८॥
परि पाप मज होईल । का नरकयातना येतील । हे काहीच पुढील । देखेना तो ॥७७९॥
तयाचेनि कारणे । अज्ञान जगी दाटणे । मग घडे दोन हात करणे । ज्ञान्याशीही ॥७८०॥
परि असो ते ऐक । अज्ञानचिन्हे आणिक । मग ज्ञान ते सम्यक । होईल तुजला ॥७८१॥
ऐसे तयाचे मन । विषयातच राही गुंतून । जशी परागाच्या वासानं । गुंते भ्रमरी ॥७८२॥
साखरेच्या त्या राशी । बैसली न उठे माशी । तैसे चित्त तयाचे स्त्रियांशी । गुंतले असे ॥७८३॥
बेडकी जशी पाण्यात राहते । नि चिलट शेंबडात अडकते । दलदलीत रुतून बसते । ढोर जैसे ॥७८४॥
घरातून ते निघणे । नाही जिवे मने प्राणे । जसे सापाचे ते रहाणे । माळ जमिनीत ॥७८५॥
पतीच्या त्या कंठाभोवती । स्त्री घालून बसते मिठी । तैसी तो आपली खोंपटी । सोडीच ना ॥७८६॥
मधाच्या त्या आशेने । मधमाश्यांनी श्रम करणे । तैसे तयाने कष्ट करणे । घरासाठी ॥७८७॥
म्हातारपणी जे होते । पुत्ररत्न ते एकुलते । मग ते आईबापा आवडते । जिवापाड ॥७८८॥
तैसे पहा पार्था । स्त्रीविषयी तया आस्था । घर पुत्रावाचुनी सर्वथा । जाणेना काही ॥७८९॥
देहात त्या अडकून । आहे मी कोण । याची नाही जाण । तयाला अर्जुना ॥७९०॥
महापुरुषाचे चित्त । जालिया ब्रह्मगत । ठाके व्यवहारजात । जयापरी ॥७९१॥
स्त्रीच्या त्या ठिकाणे । तयाने सर्वस्व अर्पणे । लाज शरम न वाटणे । तया कधी ॥७९२॥
चित्तात आराधना स्त्रीची । तिच्या मर्जीवर तो नाची । गोष्ट जैसी माकडाची । गारुड्याच्या ॥७९३॥
स्वत:स तो शिणवतो । मित्रांची मने मोडतो । पण कवडी कवडी जमवतो । स्त्रीसाठीच ॥७९४॥
दानपुण्य सोडून । नातेवाईका फसवून । स्त्रीची मर्जी राखणं । तयाने सदा ॥७९५॥
पूजाअर्चा सोडतो । सद्‌गुरुसी फसवतो । मायबापासी छळतो । स्त्रीसाठी ॥७९६॥
स्त्रीच्या भोगांसाठी । जमवी धनसंपत्ती । कमवी नाव आणि कीर्ती । तियेचे साठी ॥७९७॥
भक्तीच्या त्याकारणे । कुलदैवतेस भजणे । तैसे एकाग्र चित्ताने । भजे स्त्रीला ॥७९८॥
जे जे वाटे चांगले । ते स्त्रीसाठी आणले । इतरांना त्याने टाळले । सदैव पहा ॥७९९॥
हिला जर दु:ख होईल । तिला जर वाईट वाटेल । मग जगबुडीच होईल । वाटे तया ॥८००॥
नायट्याच्या धास्तीनं । चांदीचा नाग वाहणं । तैसी स्त्रीची इच्छा पुरवणं । स्वभाव त्याचा ॥८०१॥
किंबहुना धनंजया । स्त्रीच सर्वस्व वाटे तया । नि तिला संतती जालिया । हर्षे बहू ॥८०२॥
आणिकही जे समस्त । तियेचे असती आप्त । तयांना असे तो जपत । जिवापाड ॥८०३॥
तो अज्ञानाचे मूळ । अज्ञान त्याचे बळ । ऐसा असे तो केवळ । अज्ञान रूप ॥८०४॥
जसे खवळलेल्या सागरात । असे ती आंदोळीत । लाटांच्या त्या येरझारीत । नाव जैसी ॥८०५॥
वस्तू मनासारखी होता प्राप्त । आनंद न मावे गगनात । आणि बुडतसे दु:खात । हिरमोड होता ॥८०६॥
ऐसे जयाचे चित्ती । आसक्ती द्वेषाची वस्ती । तोच आहे महामती । अज्ञान गा ॥८०७॥
भक्ती ती करणं । फळाची आशा ठेवून । संपत्तीच्या हेतूनं । वैराग्य धरी ॥८०८॥
व्याभिचाराच्या हेतूनं । नवऱ्याची मनधरणी करणं । तैसे वरकरणी शुद्ध वर्तन । तयाचे अर्जुना ॥८०९॥
तैसे तयाचे भजन । विषयसुखाच्या लोभानं । मनी हेतू धरून । करे भक्ती ॥८१०॥
करून ते भजन । जर आशा झाली नाही पूर्ण । मग टवाळ ते म्हणणं । तयाने भक्तीला ॥८११॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

जसं त्या कुणब्यानं । नवी जमीन लागवडीखाली आणणं । तसे नवे देव मांडून । हा लोभ धरी ॥८१२॥
गुरुचा थाटमाट पाहून । तयानं मंत्र दीक्षा घेणं । नावडे गुरू थाटा वाचून । तयाला अर्जुना ॥८१३॥
सजीवांप्रति तो निष्ठुर । पाषाणमूर्तीत दाखवी आदर । स्वार्थाठायी पहा स्थिर । बुद्धी त्याची ॥८१४॥
माझी मूर्ती ती करून । कोपऱ्यात घरात बसवून । घेण्या इतर देवांचे दर्शन । फिरे तीर्थी ॥८१५॥
नित्य माझे पूजन । कार्यात कुलदेवतेचे भजन । आणि असता विशेष सण । पूजी इतरां ॥८१६॥
माझे अधिष्ठान धरी । इतरांचे व्रत करी । पितृकार्य अवसरी । पितरांचा होय ॥८१७॥
एकादशीच्या त्या दिवशी । जितका मान आम्हासी । तितकाच बा नागांसी । पंचमीला ॥८१८॥
चतुर्थी नेटकी पाहे । आणि गणेशाचाचि होये । चौदस येता म्हणे माये । तुझाच वो दुर्गे ॥८१९॥
नवमीला पूजा मांडून । करतसे तो अधिष्ठान । रविवारी खिचडी वाटणं । भैरवाची त्याने ॥८२०॥
सोमवार असता आले । लिंगासी बेल घाले । ऐसे नाना देव पूजिले । त्या एकाने पहा ॥८२१॥
ऐसा अखंड भजन करी । उगा नोहे क्षणभरी । जशी उभी गावद्वारी । वेश्या अर्जुना ॥८२२॥
तैसेनि जो भक्त । सैरावैरा असे धावत । जाण अज्ञानाचा मूर्त । अवतार तो ॥८२३॥
पाहून एकांत ते स्थान । क्षेत्र तीर्थ तपोवन । जात असे तो विटून । अंतरामाजी ॥८२४॥
गर्दीचे तया सुख । कर्मकांडाचे कौतुक । आवड तया लौकिक । विषयांची अर्जुना ॥८२५॥
आत्मानुभूती होये । ऐसी जी विद्या आहे । त्या विद्येला तो पाहे । उपहासाने अर्जुना ॥८२६॥
उपनिषदे न तया जचे । योगशास्त्र न रुचे । अध्यात्मज्ञानी जयाचे । मनचि नाही ॥८२७॥
आत्मतत्त्वावर विश्वास । नाहीच बा तयास । स्वार्थाने आंधळी खास । बुद्धि त्याची ॥८२८॥
कर्मकांड तो जाणे । मुखोद्‌गत तया पुराणे । ज्योतिषातही पारंगत असणे । तयाने अर्जुना ॥८२९॥
शिल्पकलेत तो निपुण । स्वयंपाकातही प्रवीण । वेद मंत्राचे उच्चारण । पाठ तया ॥८३०॥
गती तेथे कामशास्त्राची । माहिती सर्व भारताची । असे ती पुराणाची । आवड तया ॥८३१॥
नीतिशास्त्र ते अवगत । वैद्यकही असे ज्ञात । कोणी न करू शके काव्यनाटकात । स्पर्धा त्याची ॥८३२॥
स्मृतीची चर्चा करतो । इंद्रजाल विद्या जाणतो । आणि वैदिक शब्दकोष असतो । चाकर त्याचा ॥८३३॥
पै व्याकरणी चोखडा । तर्की अतिगाढा । परि आत्मज्ञानी गधडा । जन्मांध तो ॥८३४॥
एका आत्मतत्त्वावाचून । अवघ्यांची तया जाण । मुळाचं मूळ नक्षत्री जन्मणं । ते ज्ञान तैसे ॥८३५॥
जसे मोराच्या त्या पिसाऱ्यात । असंख्य डोळे असतात । पण ते पाहू न शकतात । ऐसे अर्जुना ॥८३६॥
जर संजीवनी मूळ होता प्राप्त । आपले काम असे भागत । इतर वनस्पती मग तोडण्यात । अर्थ नाही ॥८३७॥
मेल्यावर कुंडली पाहणे । मृतास अलंकार घालणे । ते तर वरात काढणे । वधुवरावीण ॥८३८॥
तैसे सर्व शास्त्रांचे ज्ञान । आघवेचि अप्रमाण । एका आत्मज्ञानावीण । निरर्थक सारे ॥८३९॥
ज्याला बोध नाही स्वत:चा । अर्जुना तो बिनकामाचा । केवळ त्या पुस्तकी ज्ञानाचा । उपयोग नाही ॥८४०॥
आत्मज्ञान ते नसता । असते अज्ञानाचीच सत्ता । अज्ञानात दु:ख भय भ्रमता । ठेवली असे ॥८४१॥
अज्ञानी जे जे बोले । ते अज्ञानचि फुलले । तयाचे पुण्य जे फळले । ते अज्ञान गा ॥८४२॥
अंतरी असल्याने अज्ञान । तया बोध न होणं । मग अज्ञानातच जगणं । घडे तेथे ॥८४३॥
अलीकडच्या काठापर्यंत न पोहचता । जो आधीच फिरला माघौता । तया पैलतीराची वार्ता । समजेल का ॥८४४॥
घराच्या त्या दरवाज्यात । जो मस्तक असे पुरत । त्याला असे का काही दिसत । अर्जुना माझ्या ॥८४५॥



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

जया नसे आत्मज्ञान । तयाने अज्ञानातच राहणं । अज्ञान्याचे दु:ख हरण । शक्य नाही ॥८४६॥
ऐसा तो अज्ञानी । जो ज्ञानतत्त्व न जाणी । दु:ख तयाच्या जीवनी । सर्वकाळ ॥८४७॥
गर्भिणेने करता जेवण । गर्भाचेही पोट भरणं । हे घडे जसे ओघानं । तसे अर्जुना ॥८४८॥
आंधळ्यासी देणे आमंत्रण । तयाने दुज्या सोबत येणं । तसेच हे घडणं । आपोआप ॥८४९॥
या आधीच अर्जुना । मी सांगितले ज्ञान चिन्हांना । ऐकलेस त्या सर्वांना । आधीच तू ॥८५०॥
ती अठरा ज्ञान लक्षणे । तयाना उलट ते करणे । मग अज्ञान लक्षणे । होतात ती ॥८५१॥
मागील एका अध्यायात । हे सर्व सांगितलं होतं । गोष्ट तयाचीच होतो करत । अर्जुना मी ॥८५२॥
दुधात पाणी घालून । दूध ते वाढवणं । तसेच माझे कथन । जाहले हे ॥८५३॥
अर्थ तो न सोडता । मी बडबडलो तत्त्वत: । म्हणून लांबण ती सर्वथा । प्रकटली येथे ॥८५४॥
तेव्हा म्हणाले श्रोते जन । तुझ्या मनी आहे ज्ञान । म्हणून अर्थाचं लांब होणं । घडल येथे ॥८५५॥
भगवान श्रीकृष्णानं । जे ठेवलं होतं झाकून । ते उघड करून । सांगितले तू ॥८५६॥
तू देवाचेच मनोगत । स्पष्ट करून आहेस सांगत । म्हणून आहे आम्हा समजत । ज्ञान येथे ॥८५७॥
जास्तीचे न आम्ही बोलो । मनी खूश आहे झालो । श्रवण नौकेत बैसलो । आम्ही तुझ्या ॥८५८॥
आता बा सत्वरी । जे बोलला तो श्रीहरी । ते आम्हासी कथन करी । वेगे पहा ॥८५९॥
ते वाक्य ऐकून । म्हटलं मग ज्ञानदेवानं । भगवंताचं ते म्हणणं । ऐका आता ॥८६०॥
आताच तू पांडवा । ऐकलास चिन्हसमूह आघवा । तोचि तू जाणावा । अज्ञान म्हणुनी ॥८६१॥
अज्ञान ते टाकून । कर प्राप्त तू ज्ञान । मग तुझे ते कल्याण । होईल अर्जुना ॥८६२॥
प्राप्त होता जे ज्ञान । घडे ज्ञेयाचं प्रकटन । ते ऐकण्याची इच्छा उत्पन्न । जाहली अर्जुना ॥८६३॥
तयाचा भाव पाहून । मग म्हणाला भगवान । ज्ञेय सांगतो समजावून । तुजला आता ॥८६४॥
ब्रह्मासी ज्ञेय म्हणणे । ते येणेचि कारणे । त्या ज्ञान स्वरूपानेच जाणणे । होतसे तया ॥८६५॥
आणि जाणल्यावर ते । काहीच न करणे जेथे । जाणीव आणि जाणते । भिन्न नाही ॥८६६॥
ते जाहले असता ज्ञान । संसार जातो सुटून । मग आत्मतत्त्वी एकत्व पावणं । घडे तेथे ॥८६७॥
ते ज्ञेय गा ऐसे । आदि जया नसे । परब्रह्म आपैसे । नाम जया ॥८६८॥
जे नाही म्हणो जाईजे । तव विश्वाकारे देखिजे । आणि विश्वचि ऐसे म्हणिजे । तरी ते माया ॥८६९॥
रूप वर्ण व्यक्ति । नाही दृश्य द्रष्टा स्थिती । मग तयाची उपस्थिती । मानावी कैसी ॥८७०॥
आणि नाही जर म्हणणे । मग कैसे विश्वाचे स्फुरणे । कोणाच्या त्या कारणे । प्रकटे विश्व ॥८७१॥
म्हणून आहे नाही ही बोली । पहा मुकीच ती झाली । विचारांचीच ती मोडली । वाट जेथे ॥८७२॥
जसे मडके घडा घागर । तो मातीचाच प्रकार । तैसे सर्व चराचर । ब्रह्मचि अर्जुना ॥८७३॥
येथे जे काही घडते । ते अर्जुना ब्रह्मचि असते । येथे ब्रह्माविना न होते । क्रिया काही ॥८७४॥
याचेच त्या कारणे । ब्रह्मासि विश्वबाहू म्हणणे । जे सर्वचि सर्वपणे । सर्वदा करी ॥८७५॥
आणि समस्तांही ठाया । एके काळी धनंजया । आले म्हणोनि जया । विश्वांघ्रि नाम ॥८७६॥
जसं त्या सूर्यानं । सर्वांगाने पहाणं । तैसे अनंत जाणीव जे ज्ञान । स्वरूप तुझे ॥८७७॥
म्हणून त्या वेदानं । केलं तुझं वर्णन । विश्वत चक्षु भगवान । नाम तुझे ॥८७८॥
सर्व विश्व होऊन । तुझं बा नांदणं । म्हणून विश्वमूर्धा नावानं । ओळखती तुला ॥८७९॥



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

मूर्ति आणि मुख । अग्निठायी एक । तैसे बा वैश्विक । स्वरूप तुझे ॥८८०॥
या कारणेच पार्था । विश्वतोमुख ही वंदता । श्रुतीची ती कथा । तैसी आहे ॥८८१॥
वस्तु आणि गगन । जैसे असती संलग्न । तैसे शब्द आणि कान । भिन्न नाही ॥८८२॥
म्हणोनि आम्ही तयाते । सर्वत्र म्हणो आइकते । जे असे सर्वांते । व्यापून गा ॥८८३॥
अशा सर्व नावानं । वेद करती वर्णन । ते दाखविण्या व्यापकपण । ईश्वराचे गा ॥८८४॥
शरीर इंद्रियांवाचून । तयाचं स्वरूप असणं । म्हणून शून्य तया म्हणणं । न वाटे योग्य ॥८८५॥
लाटा लाटेसी सागरात । असती त्या गिळत । पण गिळलेले आणि गिळणाऱ्यात । भेद नाही ॥८८६॥
सर्वांठायी जे एक । तेथे कैसे व्याप्य आणि व्यापक । पण सोईसाठी अनेक । म्हणावे लागे ॥८८७॥
जैसे दाखवण्या शून्य । एक बिंदू तो काढणं । तैसे अद्वैत ते सांगणं । शब्दामाजी ॥८८८॥
नाही तर काय होईल । गुरुशिष्य संप्रदाय लोपेल । ज्ञानपरंपरा संपेल । अर्जुना माझ्या ॥८८९॥
म्हणून अद्वैताचं वर्णन । द्वैतात केले वेदानं । केले पहा निरूपण । शब्दांमाजी ॥८९०॥
येथे जे काही अनुभवा येते । ते सर्व ब्रह्म असते । तयाचे वर्णन ते । ऐक आता ॥८९१॥
ब्रह्म भासते कैसे । अवकाशी आकाश जैसे । वस्त्राचे रूप घेऊन जैसे । राहती तंतू ॥८९२॥
उदक होऊन उदकात । जसे रसतत्त्व असे रहात । वा प्रकाश तत्त्व जसे दीपात । रहाते अर्जुना ॥८९३॥
कापूर होऊन कापरात । जसे गंधतत्त्व असे रहात । कर्म जसे शरीरात । शरीर होई ॥८९४॥
जैसे सोनेच बनते अलंकार । तैसे ब्रह्मच होतसे जगदाकार । ब्रह्म आणि चराचर । भिन्न नाही ॥८९५॥
ब्रह्म जोपर्यंत ब्रह्मस्वरूपात । त्यास ब्रह्मच म्हणतात । परंतु बनता ते जगत । चराचर म्हणती ॥८९६॥
जसे लोखंड धरता अग्नीत । लोखंड असे तपत । पण लोखंड नाही होत । अग्नी कधी ॥८९७॥
घटाच्या त्या ठिकाणी । आकाश वाटे घटावानी । आणि मठी ते चौकोनी । भासते अर्जुना ॥८९८॥
वेटोळा वा चौरस आकार । नसे आकाश खरोखर । तसे ब्रह्मच होतसे विकार । पण विकारी नोहे ॥८९९॥
पंचभुते इंद्रिय आणि मन । सत्त्वादि ते त्रिगुण । ते ब्रह्मचि तू जाण । अर्जुना माझ्या ॥९००॥
गोडी जशी गुळात । असते ती वसत । तैसे ब्रह्म चराचरांत । वसते अर्जुना ॥९०१॥
जसे दुधाच्या त्या स्वरूपात । तूपही असे नांदत । पण दूध ते तूप नसतं । तैसे अर्जुना ॥९०२॥
विकारांच्या कारणे । न घडे ब्रह्माठायी विकारणे । जैसे सोने अलंकार बनणे । न विकारता अर्जुना ॥९०३॥
मनइंद्रियापलीकडे जाता । अनुभवा येते ब्रह्मसत्ता । मनइंद्रियात असता । ज्ञान नाही ॥९०४॥
नामरूप संबंध । गुण आकार क्रिया भेद । हे सर्व बा प्रवाद । ब्रह्मा नाही ॥९०५॥
ब्रह्माठायी नसती गुण । परी ब्रह्माकारणेच भासमान । गुण आकाराचं प्रकटन । ब्रह्मी अर्जुना ॥९०६॥
गुण आकाराच्या कारणे । ब्रह्माठायी न घडे विकारणे । परि भ्रांताने तैसे मानणे । भ्रांती अर्जुना ॥९०७॥
आकाशाने ढगा धारण करणे । तैसे ते विकारणे । जसे प्रतिबिंबाचे असणे । आरशाठायी ॥९०८॥
सूर्यबिंब जैसे पाण्यात । वा मृगजळ जैसे किरणात । तैसे सृष्टी त्या वस्तूत । प्रकटली भासे ॥९०९॥
ऐसे संबंधेवीण । त्या वस्तुठायीच सृष्टी प्रकटन । परि ते वस्तूचं विकारणं । नसे अर्जुना ॥९१०॥
ऐसे बा निर्गुणाने । गुणांचा भोग घेणे । जसे रंकाने राज्य करणे । स्वप्नी अर्जुना ॥९११॥
ब्रह्माठायी ते गुण । अथवा ब्रह्माने उपभोग घेणं । चुकीचं ते बोलणं । अर्जुना माझ्या ॥९१२॥
जसे भिन्न भिन्न अग्नीत । एकच उष्णता असे वसत । तैसे चराचरात असतं । ब्रह्म अर्जुना ॥९१३॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

# ॥जेथे जेथे मराठी माणूस, तेथे तेथे ज्ञानेश्वरी॥

सर्वत्र वेद यज्ञाचा घाट।अन् सुविद्येचा झडझडाट। वारा सत्वगुणाचा सोसाट। वाहू लागे॥

अशी सुसाट सुगंधी वाऱ्यासारखी ज्ञानेश्वरी सर्वत्र पसरवावी. जगातील प्रत्येक मराठी माणसाने त्याचा आनंद घ्यावा व अवघे जन सुखी व्हावे अशी ज्वलंत आणि तीव्र ईच्छाशक्ती असणाऱ्या सर्व वयाच्या वाचकांनी आमच्याशी संपर्क साधावा. आपण जर अजून एकापर्यंत ही ज्ञानेश्वरी पोहोचवू शकत असलात तरी ते एक महत्त्वाचे काम होईल. सहस्त्र बाहू, लक्ष मने या कार्यात लागले तर हा गोवर्धन सहज उचलू शकतील. आपल्या संपर्कात काही प्रसार माध्यम असेल तर हे काम अधिकच सोपे होईल. आपल्या हाती जे असेल ते साधन वापरून आपण या ज्ञानियांच्या राजाच्या ज्ञानानुभवाचा प्रसार करूया.

ज्ञानेश्वर माऊलींचा संदेश सर्व जगात सुगंधासारखा पसरो आणि सर्व जीव सुखी होवोत अशी प्रार्थना करून या कामाला सुरूवात करूया.

सामिल होण्यासाठी लिहा : esahity@gmail.com

संपूर्ण ज्ञानेश्वरीसाठी भेट द्या : www.esahity.com

Facebook वर पहा : http://www.facebook.com/edyaneshwari

ब्लॉगला भेट द्या : http://edyaneshwari.blogspot.in/

या शिवाय या ज्ञानेश्वरीचे तीस तासांचे सांगीतिक पारायण उपलब्ध असून कोणाला FM Radio किंवा तत्सम प्रसार माध्यमासाठी हवे असल्यास संपर्क साधावा. हे सांगितिक ई पारायण लवकरच स्वरनेटाक्षरी या ई साहित्य प्रतिष्ठानच्या ऑडिओ वेबसाईटवर उपलब्ध होईल.

ई मेल द्वारे दर गुरूवारी एक एक भाग ई साहित्य प्रतिष्ठानच्या सव्वा लाख वाचकांना उपलब्ध केला जाणार आहेच. त्यांच्या मार्फ़त ही ज्ञानेश्वरी किमान बारा लाख मराठी माणसांपर्यंत जाणार हे तर निश्चितच.

जगातील बारा कोटी मराठी मनांपर्यंत ती पोहोचावी ! या ज्ञानयज्ञात आपण सहभागी व्हाल ना!

अध्यात्म विषयाचे सखोल मनन, चिंतन व मंथन करून वेशाने साधू नसलेले, पण वृत्तीने साधू असलेले ज्यांच्यावर मी खूप खूप प्रेम करतो, असे श्री विजयजी पांढरे. विजयजी यांनी 'समग्र ज्ञानेश्वर' अगदी सरळ मराठी भाषेत यावेत यासाठी दिनरजनी अथक प्रयास केला आहे. प्रथम त्यांनी 'अमृतानुभव' अगदी सोप्या व सरळ मराठीत ओवीबद्ध केला, नंतर 'चांगदेव पासष्टी' त्याचबरोबर आता श्री ज्ञानेश्वरीसारखा विशाल व ९०३४ ओव्यांनी ओतप्रोत असलेल्या ग्रंथाला ओवीबध्द करुन पूर्ण केले आहे.

श्री. विजयजी यांच्या या पवित्र कार्याचा व विचाराचा भाविकांनी, ज्ञानेश्वरीवर प्रेम करणाऱ्या वारकऱ्यांनी, अभ्यासूंनी खूप आदर करावा. सर्वांना समजेल, सहज कळेल अशी सोपी भाषा त्यांनी ज्ञानेश्वरीवर प्रतिज्ञानेश्वरी रचतांना वापरली आहे. या मागील त्यांचा पवित्र उद्देश हाच आहे, की संत ज्ञानेश्वर महाराजांची ज्ञानेश्वरी सर्व लोकांना कळावी. म्हणून पारंपारिक संकोचित वृत्तीचा परित्याग करून व्यापक विचाराच्या दृष्टीतून या सोप्या भाषेतील ज्ञानेश्वरीकडे सर्व भाविकांनी व वारकरी संप्रदायातील सर्व संतांनी पाहावे अशी मी आशा करतो. विशेष म्हणजे वारकऱ्यासारखा न दिसणारा परंतु ह्रदयातून पूर्ण वारकरीच असणारा हा तत्त्वचिंतक मी अतिशय जवळून अनुभवलेला आहे. म्हणून त्यांच्या विचाराचा व या आध्यात्मिक कार्याचा खूप आदर करतो . त्यांच्या या कार्याला माझे अनंतानंत शुभ आशीर्वाद. पुन्हा त्यांच्या हातून अशीच वाङ्मयीन सेवा घडत राहो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

परमहितैषी आचार्य स्वामी हरिचैतन्य
गुरुदेव आश्रम, पळसखेड (स.), बुलढाणा

---

आजच्या मराठी भाषेत ओवीबद्ध झालेली अशी ही ओवीरचना भावार्थ ज्ञानेश्वरीच्या रूपाने प्रकटली आहे ती ईश्वरी कृपाच होय. मनुष्याची बुद्धी हे काम नक्कीच करू शकत नाही. हा भावार्थ वाचताना मनाची पकड तर घेतोच पण वाचता वाचता गोडी अधिकच वाढत जाते व मनाचा वेगळ्या विश्वात प्रवेश होतो. आत्मज्ञानासंबंधीचे सविस्तर निरूपण पुन्हा एकदा सुलभ स्वरूपात जनसामान्यांच्या भाषेत ज्ञानेश्वरीची मूळ गोडी घेऊन प्रकटले आहे.

ह.भ.प.संजय महाराज पाचपोर
गुप्तेश्वर संस्थान, मु.पो.शिर्ला, ता.खामगांव जि.बुलढाणा

---

'चांगदेव पासष्टी' व 'अमृतानुभव' आणि 'भावार्थ गीता' या दोन ग्रंथांनंतर आता 'भावार्थ ज्ञानेश्वरी' हा ओवीबद्ध ग्रंथ घेऊन श्री.विजय बळवंत पांढरे वाचकांच्या भेटीला येत आहेत. इथे वाचकांच्या भेटीला हा शब्द मी वापरला पण श्री.विजय बळवंत पांढरे यांच्या या लेखनाचा वाचक हा `टाइमपास` करण्यासाठी छापील माकुरावरून नजर फिरवणारा वाचक नव्हे ! याच्या चित्ताला आध्यात्मिक तळमळीचा, ओझरता का होईना स्पर्श झालेला आहे असा हा वाचक आहे. साधनेच्या मार्गावर पाऊल टाकू इच्छिणारा किंवा ज्याने पाऊल टाकले आहे असा हा वाचक आहे. असा वाचक जेव्हा भगवद्‌गीता, चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, ज्ञानेश्वरी या ग्रंथांवरील लेखन वाचतो तेव्हा त्याचे वाचन ही त्याच्या आंतरिक साधनेची वाटचाल असते. श्री.विजय बळवंत पांढरे ज्ञानेश्वरीचे साधक, अभ्यासक आहेत; पंडित अभ्यासक नव्हेत. त्यामुळे त्यांच्या ज्ञानेश्वरीच्या अभ्यासाला साधनेचा सुगंध आहे. सर्वसामान्य माणसापर्यंत सुलभीकरणाच्या मार्गाने ज्ञानेश्वरी पोचवण्याचा श्री.विजय बळवंत पांढरे यांचा हा प्रयत्न त्यांच्या हेतूची पूर्तता करणाच्या दृष्टीने यशस्वी ठरेल असा मला विश्वास वाटतो.

कविवर्य मंगेश पांडगावकर,
साईप्रसाद, सायन(प), मुंबई

---

ज्ञानेश्वरी ही मराठी भाषेत असली, तरी आमच्या मराठी भाषिकाला ती समजणे अवघड जाते हे खरे. कारण ज्ञानेश्वरीत यादवकाळात प्रचलित असलेले शब्द व विधानांची वळणे आहेत. विजय पांढरे यांनी ज्ञानेश्वरीचे हृदगत नीट सांभाळून प्रचलित मराठीत आणले आहे व ते बरेच सुबोध झाले आहे. भाषा-भाषांमधील प्रवास चांगल्या वाटाड्याच्या सहाय्याने अर्थाला निर्वेधपणे करता येतो.

श्री. पांढरे यांचे निर्वाहाचे क्षेत्र वेगळे आहे, तरी ज्ञानेश्वरांनी त्यांना वेड लावले. त्यामुळे रूपांतराच्या निमित्ताने एका लोकोत्तर साक्षात्कारी संतांच्या योगयुक्त वाणीच्या मनोमय सान्निध्यात त्यांना काही काळ घालवता आला. त्यामुळे उरलेल्या आयुष्याची पाऊलवाट सोन्याची झाल्याची कृतकृत्यता त्यांना मिळेल. संतांचा एवढा प्रसादही पूर्वसंचितामुळेच लाभू शकतो, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

मा. राम शेवाळकर, नागपूर

esahity@gmail.com
ई साहित्य प्रतिष्ठान®
www.esahity.com

## श्री विजय पांढरे यांची ओळख

श्री विजय बळवंत पांढरे (BE Civil) हे मुख्य अभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, (M.E.R.I.), नाशिक येथे अधीक्षक अभियंता व सहसंचालक या पदावर कार्यरत असून त्यांनी चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, भगवद्गीता व ज्ञानेश्वरी या चारही ग्रंथांचे आधुनिक प्रचलीत मराठीत सुलभ असे ओवीबद्ध रुपांतर केले अनुवाद केले आहेत. सदर ओवीबद्ध ग्रंथ ऑडिओ स्वरुपात व छापील स्वरूपातही उपलब्ध आहेत. त्यांनी नुकतीच अष्टावक्रगीताही आजच्या मराठीत ओवीबद्ध केली आहे. अध्यात्म हा चित्तस्थिरीकरणाचा , चित्तशुद्धीचा व चित्तलयाचा विषय असल्याचे या सर्व ग्रंथातून त्यांनी स्पष्टपणे मांडले आहे. सर्व धर्म, सर्व मार्ग, सर्व साधना, सर्व गुरू, सर्व ग्रंथ या सगळयांचे सार तेच आहे. सर्वांनी असा शास्त्रीय दृष्टीकोन बाळगल्यास आत्मज्ञान दूर नाही असे ते स्वानुभवावर सांगतात. (दूरभाष : ९८२२९९२५७८)

## ई साहित्य प्रतिष्ठान

२००८ पासून मराठी ई पुस्तकांच्या निर्मितीत आणि वितरणात महत्त्वाचा वाटा ई साहित्य प्रतिष्ठानने उचलला आहे. आजवर २०० हून अधिक ई पुस्तकांची निर्मिती करणाऱ्या ई साहित्य प्रतिष्ठानचे आजघडीला सव्वा लाख वाचक आहेत. या सर्व वाचकांपर्यंत ही ई पुस्तके विनामूल्य वितरित केली जातात.

विनामूल्य ई पुस्तकांसाठी मेल पाठवा : esahity@gmail.com

अधिक माहिती साठी भेट द्या : www.esahity.com

फ़ोन : ९८६९६७४८२०